ePaper

# महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष पोहोचला सुप्रीम कोर्टात, शिंदे गटाच्या दोन याचिका



| वर्ष - 6 | अंक - 82 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- आमदार एकनाथ शिंदे यांची शिवसैनिकांनी काढली प्रतिकात्मक अंत्ययात्रा
- एकनाथ शिंदेंचं बंड पिंपरी-चिंचवडला मंत्रिपद मिळवून देणार?
- उद्धव ठाकरेंनी राजीनामा द्यायचा की नाही हे त्यांनी ठरवावं

www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 27 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"मुंबई बॉंबस्फोट घडवून निष्पाप मुंबईकरांचा जीव घेणाऱ्या दाऊदशी थेट संबंध असणाऱ्यांना हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना समर्थन कशी करू शकते...? यालाच विरोध म्हणून हे पाऊल उचलले आहे. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांसाठी आणि बाळासाहेबांची शिवसेना वाचविण्यासाठी आम्हाला मरण जरी आलं तरी बेहत्तर. तसे झाल्यास आम्ही सारे आमचं भाग्य समजू."

**- एकनाथ शिंदे**

आम्ही एकाच बापाचे आहोत, जे गेले ते अनेक बापाचे आहेत, असं संजय राऊत म्हणाले होते. महाराष्ट्राने महिलांना नेहमी सन्मान दिलेला आहे. कल्याणच्या सुभेदाराचा पराभव केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या पत्नीला आईची उपमा दिली होती. त्यात शिवाजी महाराजांचे नाव घेऊन चालणाऱ्या शिवसेनेमध्ये अशा तऱ्हेचा प्रवक्ता पक्षप्रमुखांना चालतो का. मी आतापर्यंत शांत राहिलो. या वक्तव्यातून काय अर्थ निघतो. त्यांना निवडून दिलं.

**- दीपक केसरकर,** आमदार



## शॉर्ट न्यूज »

### वीज तोडण्याची भीती घालून सायबर चोरट्यांकडून चार लाखांचा गंडा

**पुणे ।** वीज तोडण्याची भीती घालून सामान्यांना गंडा घालण्याचे सत्र कायम आहे. सायबर चोरट्यांनी विश्रांतवाडी भागातील एका नागरिकाला वीज तोडण्याची भीती घालून चार लाखांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत एकाने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी दोघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्राथमिक तपासात सायबर चोरटे बिहारमधील असल्याचे निष्पन्न झाले आहे. तक्रारदार धानोरी भागात राहायला आहेत. तक्रारदाराच्या मोबाइलवर सायबर चोरट्यांनी संदेश पाठविला होता. वीज देयक न भरल्यास वीज कापण्यात येईल, असे संदेशात म्हटले होते.

शहरी भागातील हौसिंग सोसायट्यांच्या सुविधा उपलब्ध होणार

# आमदारांना करावे लागणार वर्षाला अडीच कोटी खर्च!

## आमदार निधीतून सीसीटीव्ही, ईव्ही चार्जिंग सेंटर, एसटीपी आणि कचरा प्रक्रिया प्रकल्प राबवले जाणार

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरातील आमदारांना त्यांच्या निधीतून कामे करण्यास मर्यादा येत होती. ती लक्षात घेऊन आता शहरी भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांत सीसीटीव्ही व सोलर सिस्टीम बसवणे, ईव्ही चार्जिंग सेंटर, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे ही खर्चिक व या संस्थावर मोठा आर्थिक बोजा टाकणारी कामे प्रथमच आमदार निधीतून होणार आहेत. त्यामुळे शहर स्वच्छतेस तसेच पर्यावरण संवर्धनास हातभारही लागणार आहे. तसेच या सोसायट्यांचे रुपडेही पालटणार आहे. चिंचवडचे



भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांनी उपसचिव अध्यक्ष असलेल्या सरकारी समितीकडे आमदार निधीतून शहरी भागातील गृहनिर्माण संस्थात खेळणी आणि सीसीटीव्ही बसविणे, वृक्षारोपण करणे यासह इतर कामे सुचविली होती. त्यांची ही मागणी अंशत मान्य झाली असून सोसायट्यांत सीसीटीव्ही आणि वृक्षारोपणासाठी आमदार निधीचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्याजोडीने या निधीतून या संस्थांत टाकाऊ पदार्थांचा (प्लॅस्टिक, राख आदी) वापर करून रस्ते तयार करणे, बालोद्यान विकसित करणे, जॉगिंग ट्रॅक करणे, सोलर सिस्टीम व सौरदिवे बसवणे, रॅम्प तयार करणे ही कामेही प्रथमच आमदार निधीतून होणार आहेत. मात्र, ही परवानगी देताना काही जाचक अटींचा कोलदांडा घालण्यात आला आहे. त्यामुळे या आमदार निधीचा फायदा हौसिंग सोसायट्यांना सहजासहजी मिळणार नाही.

### प्रत्येक आमदाराला खर्च करण्याचे बंधन


वर्षाला या सोसायट्यांत प्रत्येक आमदाराला अडीच कोटी रुपये खर्च करण्याचे बंधन टाकण्यात आले आहे. महाविकास आघाडी सरकारमधील शिवसेनेचे नेते व नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मोठ्या बंडामुळे राज्य सरकार अस्थिर झाले असताना गेल्या तीन दिवसांपासून काही शेकडो सरकारी आदेश (जीआर) निघाले आहेत. त्यात एक हा शहरी भागातील आमदारांच्या निधीतून होणाऱ्या कामात आणखी एका कामाची भर टाकणारा हा आहे. नियोजन विभागाने तो नुकताच जारी केला. त्यानुसार आतापर्यंत शहरी भागातील महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रातील व त्या लगतच्या भागातील हौसिंग सोसायट्यांत वापरला न जाणारा आमदार निधी प्रथमच तेथे उपयोगात आणला जाणार आहे.

# पुणे शहरातील सहा प्रभागात महिला मतदारांची संख्या सर्वाधिक

## निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी जाहीर

**। पुणे । महाईन्यूज ।**

आगामी महापालिका निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीनुसार शहरातील सहा प्रभागात महिला मतदारांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे या सहा प्रभागात महिलांची मतदार निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिकेच्या निवडणूक शाखेने प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी जाहीर केली आहे. निवडणुकीसाठी ५८ प्रभाग असून १७३ नगरसेवक निवडून येणार आहेत. धायरी-आंबेगाव आणि मगरपट्टा-साधना विद्यालय प्रभाग वगळता अन्य प्रभागातील मतदारांची संख्या किमान पन्नास हजारांपासून कमाल ८३ हजार या दरम्यान निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये सहा मतदार संघात महिला मतदारांची संख्या सर्वाधिक आहे.



गोखलेनगर-वडारवाडी (प्रभाग क्रमांक-१५), फर्ग्युसन महाविद्यालय-एरंडवणा (प्रभाग क्रमांक १६), शनिवार पेठ-नवी पेठ (प्रभाग क्रमांक १७), शनिवारवाडा-कसबा पेठ (प्रभाग क्रमांक १८), छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम-रास्ता पेठ (प्रभाग क्रमांक १९) आणि घोरपडे पेठ उद्यान-महात्मा फुले मंडई (प्रभाग क्रमांक २९) या सहा प्रभागात महिला मतदार निर्णायक ठरणार आहेत. विशेष म्हणजे हे सर्व प्रभाग शहराच्या मध्यवर्ती भागातील आहेत. आगामी महापालिका निवडणूक सन २०११ च्या जनगणनेनुसार होणार आहे. निवडणुकीसाठी ३४ लाख ५८ हजार ७१४ मतदारांची प्रारूप यादी जाहीर करण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीमध्ये १८ लाख ७ हजार ६६३ पुरुष मतदार तर १६ लाख ५० हजार ८०७ स्त्री मतदार आहेत. अन्य मतदारांची संख्या २४४ एवढी प्रारूप मतदार यादीत दर्शविण्यात आली आहे. सन २०१७ च्या तुलनेत मतदारांच्या संख्येत ८ लाख २३ हजार ९१६ एवढी वाढ झाली आहे. प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीवर हरकती-सूचना मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली असून १ जुलैपर्यंत हरकती-सूचना नोंदविता येणार आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### सिंहगडावर ट्रेकिंग दरम्यान कडा कोसळून पुण्यातील तरूण गिर्यारोहकाचा मृत्यू

। पुणे । महाईन्यूज ।

पुण्यातील सिंगडावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या एका ३१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. सिंहगडावरील कल्याण दरवाजाच्या बुरुजा जवळील कडा कोसळल्याने या तरूम गिर्यारोहकाचा मृत्यू झाला आहे. हेमंत धीरज गाला (रा. मित्रमंडळ चौक, पुणे) असे या तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आतकरवाडी येथून काल(शनिवार) सकाळी सहा वाजेच्या सुमारास सिंहगडाच्या दिशेने ट्रेकिंग स्पर्धेला सुरुवात झाली होती. यामध्ये राज्यातील जवळपास ३०० स्पर्धक सहभागी झाले होते. त्यामध्ये हेमंत गाला हा २२ किलोमीटरच्या शर्यतीत सहभागी झाला होता.

सिंहगड किल्ल्याच्या कल्याण दरवाजाच्या जवळ आल्यावर, अचानक तेथील बुरुजाचा कडा कोसळला आणि हेमंत हा दीडशे फुट खोल दरीत जाऊन पडला. या घटनेत हेमंतचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर त्याचा मृतदेह दोरीच्या सहाय्याने काढण्यात आल्याचे हवेली पोलिसांनी सांगितले.

# आमदार एकनाथ शिंदे यांची शिवसैनिकांनी काढली प्रतिकात्मक अंत्ययात्रा

## एकनाथ शिंदे यांच्या विरोधात विविध ठिकाणी आंदोलन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



शिवसेनेचे बंडखोर आमदार एकनाथ शिंदे यांच्या विरोधात आज पुण्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आली. त्याच दरम्यान टिंबर मार्केट ते रामोशी गेट पर्यन्त पुणे शहर प्रमुख संजय मोरे यांच्या नेतृत्वाखाली एकनाथ शिंदे यांची प्रतिकात्मक अंत्ययात्रा शववाहिकेमधून काढण्यात आली. या शववाहिकेवर ‘बंडखोर आमदार पंगतीतले कावळे,बंडखोर आमदार डोम कावळा’ हे फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.तर यावेळी एकनाथ शिंदे विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली.

शिवसेनेचे नेते नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मागील सहा दिवसापासून शिवसेनेविरुद्ध बंड पुकारले आहे.यामुळे राज्यामधील सत्तासंघर्ष अधिक तीव्र झाल्याचे चित्र दिसत आहे. एकनाथ शिंदेंनी आपल्याकडे 46 आमदारांचा पाठिंबा असल्याचं दावा केला असून उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडण्याची मागणी केली आहे. त्यामुळे राज्यातील शिवसैनिक आक्रमक झाल्याचे पाहण्यास मिळत आहे.त्या पार्श्वभूमीवर काल शिवसेनेचे बंडखोर नेते आमदार तानाजी सावंत यांच पुण्यातील बालाजीनगर येथील मे. भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेडचे ऑफिसची तोडफोड झाल्याची घटना घडली.

तर त्याच दरम्यान सदाशिव पेठेतील वैद्यकीय मदत कक्षावरील एकनाथ शिंदे, श्रीकांत शिंदे,मंगेश चिवटे यांच्या फोटोला शिवसेनेचे माजी नगरसेवक विशाल धनवडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी काळे फासल्याची घटना घडली होती. त्यानंतर आज सकाळी कोथरूड येथील कर्वे पुतळ्यासमोर शिवसेना पुणे शहर प्रमुख गजानन थरकुडे आणि शिवसेनेचे माजी गटनेते पृथ्वीराज सुतार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे बंडखोर आमदार एकनाथ शिंदे यांच्या फोटोला शिवसैनिकांकडून जोडे मारो आंदोलन करण्यात आले. त्यानंतर दुपारी पाच वाजण्याच्या सुमारास टिंबर मार्केट शिवसेनेच्या आजी माजी पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेण्यात आला.त्यावेळी खासदार श्रीरंग बारणे आणि विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन देखील केले. त्या कार्यक्रमानंतर टिंबर मार्केट ते रामोशी गेट दरम्यान एकनाथ शिंदे यांची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. या आंदोलनात कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होत,एकनाथ शिंदे विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील केली.



# बोलणाऱ्या नव्हे तर हिंदुत्व जगणाऱ्या लोकांची आवश्यकता – सुनील देवधर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आणि बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या जयंतीनिमित्ताने ‘वंदे मातरम’चे गाढे अभ्यासक मिलिंद सबनीस लिखित ‘ऋषी बंकिमचंद्र’ या ग्रंथाचे प्रकाशन देवधर यांच्या हस्ते झाले.

पुणे : देशाचा मूलभूत विचार हा हिंदुत्व आहे. तो आचरणात आणणे आणि जगाला दाखवणे गरजेचे आहे. देशाला हिंदुत्व बोलणाऱ्या नाही, तर हिंदुत्व जगणाऱ्या लोकांची गरज आहे,” असे मत भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांनी व्यक्त केले.स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आणि बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या जयंतीनिमित्ताने ‘वंदे मातरम’चे गाढे अभ्यासक मिलिंद सबनीस लिखित ‘ऋषी बंकिमचंद्र’ या ग्रंथाचे प्रकाशन देवधर यांच्या हस्ते झाले. यावेळी ‘ऋषी बंकिमचंद्र : आजच्या संदर्भात’ या विषयावर देवधर बोलत होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह धनंजय कुलकर्णी, ‘जटायु अक्षरसेवा’चे संतोष जाधव, प्रकृती केअर फाउंडेशनचे ज्ञानोबा मुंढे आदी यावेळी उपस्थित होते. हिंदुत्व हा देशाचा मूलभूत विचार हा हिंदुत्व आहे. तो आचरणात आणणे आणि जगाला दाखवणे गरजेचे आहे. आपला समाज हा विचार आणि आचार मानणारा समाज आहे. माणसाचे आचरण ठरवते ती व्यक्ती कशी आहे. देशाने दिलेला विचार जगाने दिलेल्या विचारापेक्षा पूर्णतः वेगळा आहे. युगे बदलली तरी आपला विचार बदलणार नाही, असे सुनील देवधर यांनी सांगितले. सबनीस म्हणाले, गेल्या २५ वर्षांपासून वंदे मातरमसाठी स्वतःला वाहून घेतले. वंदे मातरमला चार लोकांचा स्पर्श झाला. त्यात ऋषी बंकिमचंद्र यांचा सहभाग होता. या लोकांनी भारताचा इतिहास घडवला आहे. स्वातंत्र्य लढ्याला वंदे मातरमच्या रुपाने शस्त्र मिळाले.

# टोमॅटोचे दर पूर्वपदावर आवक वाढली, ग्राहकांना दिलासा

## शंभरीपार गेलेल्या टोमॅटोची बाजारात आवक वाढल्याने दरात घट

पुणे । महाईन्यूज ।



पंधरवड्यापूर्वी शंभरीपार गेलेल्या टोमॅटोची बाजारात आवक वाढल्याने दरात घट झाली आहे. किरकोळ बाजारात एक किलो टोमॅटोचे दर प्रतवारीनुसार ६० ते ७० रुपये किलो झाल्याने ग्राहकांना किंचित दिलासा मिळाला आहे.

उन्हाळ्यामुळे टोमॅटोच्या लागवडीत घट झाली होती. त्यामुळे गेल्या दीड महिन्यांपासून बाजारात टोमॅटोची आवक कमी होत होती. मागणीच्या तुलनेत आवक कमी झाल्याने घाऊक आणि किरकोळ बाजारात टोमॅटोच्या दरात टप्याटप्याने वाढ होत गेली. किरकोळ बाजारात एक किलो टोमॅटोचे दर १०० ते १२० रुपयांपर्यत गेले होते. दैनंदिन वापरातील कांदा-बटाट्याच्या तुलनेत टोमॅटोचे दर शंभरीपार झाल्याने गृहिणींचे अंदाजपत्रक कोलमडले होते. त्यानंतर गेल्या आठवड्यापासून नवीन लागवड केलेल्या टोमॅटोची आवक बाजारात सुरू झाल्याने दरात घट झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील प्रमुख अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे जिल्ह्यातील खेड, मंचर, नारायणगाव, सातारा जिल्ह्यातील फलटण परिसरात टोमॅटोची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. उन्हाळ्यामुळे मध्यंतरी या भागात टोमॅटोची लागवड कमी झाली होती. त्यामुळे तेथून होणारी टोमॅटोची आवक कमी झाली होती. त्यानंतर लागवड केलेल्या नवीन टोमॅटोची आवक सध्या सुरू झाली आहे. टोमॅटोच्या दरात घट होत चालली आहे, असे किरकोळ बाजारातील भाजीपाला व्यापारी प्रकाश ढमढेरे यांनी सांगितले. मार्केट यार्डातील फळभाजी बाजारात टोमॅटोची आवक वाढली आहे. उन्हाळ्यात टोमॅटोची दैनंदिन आवक घटली होती. गेल्या आठवडाभरापासून बाजारात दररोज सहा ते सात हजार पेटी टोमॅटोची आवक होत असून रविवारी टोमॅटोची आवक दहा ते बारा हजार पेटी एवढी होते.

### पावसाने तडाखा न दिल्यास दर स्थिर

सध्या बाजारात टोमॅटोची आवक सुरू झाली आहे. खेड, मंचर, नारायणगाव तसेच फलटण परिसरातील टोमॅटो पुण्यातील मार्केट यार्डात विक्रीस पाठविण्यात येतो. नाशिक भागातील टोमॅटोची आवक मुंबई, ठाण्यातील बाजारात होते. काढणीस आलेल्या टोमॅटोला पावसाचा तडाखा न बसल्यास बाजारात टोमॅटोची आवक सुरळीत राहील. पावसाळ्यात टोमॅटो खराब होण्याचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे चांगल्या प्रतीच्या टोमॅटोला चांगला भाव मिळतो, असे घाऊक फळभाजी बाजारातील व्यापाऱ्यांनी सांगितले.

## शॉर्ट न्यूज

### चिंचवडमधील एका अल्पवयीन मुलाला अज्ञात इसमाने पळवले



।चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

चिंचवडमधील एका अल्पवयीन मुलाला अज्ञात इसमाने 25 जूनला पळवले. याबाबत त्या मुलाच्या आईने पिंपरी पोलिस ठाण्यात 25 जूनला अज्ञात इसमाविरोधात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा 16 वर्षांचा मुलगा पिंपरी पोलिस स्टेशन समोरील रोडवरून संध्याकाळी 7.30 वाजेच्या सुमारास कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी आमिष दाखवून व फुस लावून पळवून नेले. याप्रकरणी अज्ञात इसमा विरोधात भा. द. वि. कलम 363 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पिंपरी-चिंचवड शहराचा मंत्रीपदाचा बॅकलॉगही भरून निघणार

# शिंदेंचं बंड पिंपरी-चिंचवडला मंत्रिपद मिळवून देणार?

### देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले, तर पिंपरी चिंचवड शहराच्या पथ्यावर पडणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेना नेते आणि राज्याचे नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे महाविकास आघाडी सरकार अस्थिर झाले आहे. राज्यात सत्ताबदल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तो होऊन देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले, तर ते पिंपरी चिंचवड शहराच्या पथ्यावर पडणार आहे. कारण, त्यातून शहराला प्रथमच मंत्रीपद मिळण्याची दाट शक्यता आहे, त्यामुळे शहराचा मंत्रीपदाचा बॅकलॉगही भरून निघणार आहे.

देवेंद्र फडणवीस २०१४ मध्ये मुख्यमंत्री असताना पिंपरी-चिंचवडला किमान राज्यमंत्रीपद मिळेल, असे वाटत असताना मंत्रीमंडळ विस्तारात ते मावळला दिले गेले. शहरातील भाजपचे दोन मातब्बर आमदार चिंचवडचे लक्ष्मण जगताप आणि भोसरीचे महेश लांडगे हे त्यासाठी प्रबळ दावेदार होते. त्यासाठी त्यांनी जोरदार व्यूहरचनाही केली होती. त्यामुळे आपल्याच आमदाराला मंत्रिपद मिळेल, अशी आशा दोन्ही आमदारांच्या समर्थकांमध्ये निर्माण झाली होती. या रस्सीखेचातून कोणी नाराज होऊ नये; म्हणून ऐनवेळी मावळचे पक्षाचे निष्ठावंत आमदार बाळा भेगडे यांना भाजपने मंत्री करीत पिंपरी-चिंचवडमधील संभाव्य वाद हुशारीने टाळला होता. मात्र, त्यातून शहराची ही संधी हुकली. शहर मंत्रीपदापासून वंचित राहिले.



देवेंद्र फडणवीस २०१४ मध्ये मुख्यमंत्री असताना पिंपरी-चिंचवडला किमान राज्यमंत्रीपद मिळेल, असे वाटत असताना मंत्रीमंडळ विस्तारात ते मावळला दिले गेले. शहरातील भाजपचे दोन मातब्बर आमदार चिंचवडचे लक्ष्मण जगताप आणि भोसरीचे महेश लांडगे हे त्यासाठी प्रबळ दावेदार होते. त्यासाठी त्यांनी जोरदार व्यूहरचनाही केली होती. त्यामुळे आपल्याच आमदाराला मंत्रीपद मिळेल, अशी आशा दोन्ही आमदारांच्या समर्थकांमध्ये निर्माण झाली होती.

दरम्यान, २०१९ मध्ये पुन्हा भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या. जगताप व लांडगे पुन्हा निवडून आले, त्यामुळे शहराला पुन्हा मंत्रीपद मिळण्याची आशा निर्माण झाली. पण, शेवटच्या क्षणी शिवसेनेने सत्ता स्थापनेसाठी भाजपऐवजी दोन्ही कॉंग्रेसबरोबर आघाडी केली आणि पिंपरी-चिंचवडला मंत्रीपदाने पुन्हा हुलकावणी दिली. योगायोगाने ही संधी पुन्हा शिंदेंच्या शिवसेनेतील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या बंडामुळे चालून आली आहे.

शिवसेनेतील बंडखोरांचा हा गट भाजपला पाठिंबा देण्याची दाट शक्यता आहे. कारण, त्यांना त्यासाठीची रसद भाजपनेच पुरविलेली आहे. तसे झाले, तर पुन्हा भाजपचे सरकार राज्यात येऊन फडणवीस हे मुख्यमंत्री होण्याची शक्यता आहे. आमदार लांडगे हे फडणवीसांच्या अत्यंत निकटच्या वर्तुळातील आहेत. दुसरीकडे आमदार जगताप हे जीवघेण्या आजारामुळे सध्या त्रस्त आहेत, त्यामुळे आमदार लांडगेंना मंत्रीपदासाठी शहरातच नाही, तर मावळातसुद्धा दावेदार नाही. कारण मावळात आता भाजपचा आमदारच नाही, त्यामुळे लांडगेंचा खुंटा या वेळी बळकट झालेला आहे. त्यातून शहराला प्रथमच मंत्रीपद मिळण्याची आशा पुन्हा निर्माण झाली आहे. ती आमदार लांडगेंच्या काही समर्थकांकडून सोशल मिडियात व्यक्तही होत आहे. त्यात त्यांनी आपल्या आमदारांना थेट कॅबिनेट मंत्रीच बनवून टाकले आहे.

# चिंताजनक! शहरात आज नवीन 138 कोरोना रुग्णांची नोंद

### 227 रुग्णापैकी 89 रुग्णांचा कोरोना सक्रिय अहवाल, एकाही रुग्णाचा मृत्यू नाही

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहराच्या विविध भागातील 227 नवीन कोरोना बाधित रुग्णांची आज (रविवारी) नोंद झाली. तर, 227 रुग्णापैकी 89 रुग्णांचा कोरोना सक्रिय अहवाल हा 24 जून रोजी आलेला आहे. एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही.

आजपर्यंत शहरातील 4 हजार 624 जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. शहरातील 3 लाख 61 हजार 497 जणांना आजपर्यंत कोरोनाची लागण झाली. सध्या 867 सक्रिय रुग्ण शहरात आहेत. त्यातील 844 रुग्ण गृहविलगीकरणात उपचार घेत आहेत.

तर, 23 रुग्ण महापालिका रुग्णालयामध्ये दाखल आहेत. आज दिवसभरात 1 हजार 954 नागरिकांचे लसीकरण झाले. आजपर्यंत 36 लाख 44 हजार 219 जणांनी कोरोना प्रतिबंधक लस घेतली.



शहरातील 3 लाख 61 हजार 497 जणांना आजपर्यंत कोरोनाची लागण झाली. सध्या 867 सक्रिय रुग्ण शहरात आहेत. त्यातील 844 रुग्ण गृहविलगीकरणात उपचार घेत आहेत. तर, 23 रुग्ण महापालिका रुग्णालयामध्ये दाखल आहेत. आज दिवसभरात 1 हजार 954 नागरिकांचे लसीकरण झाले.



पिंपरी । सौ. ईलाक्षी रविंद्र महाले कुदळे यांची देहू येथे भारतीय जनता पार्टी पुणे जिल्हा (ग्रामिण) कार्यकारणी मध्ये महिला आघाडी मोर्चा उपाध्यक्ष पदी माननीय शंकर जगताप यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. यावेळी मा. राज्यमंत्री बाळासाहेब भेगडे, पुणे जिल्हा ग्रामिणचे अध्यक्ष गणेश भेगडे, संघटन सरचिटणीस धर्मेन्द्र खांडरे, मा. उपाध्यक्ष बाळासाहेब काळोखे, जिल्हा तसेच तालुका पदाधिकारी व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

## खोटे बोलण्यास नकार; 19 वर्षीय मुलीला जीवे मारण्याचा प्रयत्न

**पिंपरी :** खोटे बोलण्यास नकार दिल्याने 19 वर्षीय मुलीला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत पीडित मुलीच्या वडिलांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. बजरंग वाघीरे (रा. पिंपरी गाव) व काळेवाडीमध्ये राहणाऱ्या दोन महिला या आरोपी आहेत. त्यांच्या विरोधात भा. द. वि. कलम 307, 120 (ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी झालेल्या मुलीचे नाव सिमरन आहे. सदर दोन आरोपी महिलांपैकी एका आरोपी महिला साक्षी ही तिच्या प्रियकरासोबत पळून गेली. दुसऱ्या आरोपी महिलेने सिमरन हिला साक्षी तुझ्या घरी आली होती असे सांगण्यास बजावले. परंतु, सिमरन हिने खोटं बोलण्यास नकार दिल्याने दोन आरोपी महिलांनी बजरंग वाघीरे यास सिमरन हिला भर चौकात जीवे मारण्यास सांगितले.

## संपादकीय »

# लोकांना पचत नाही बंड!

*गेली चार दिवस राज्यात बंडाचे दिवस सुरू आहेत.एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत केलेले बंड सध्या देशभर गाजत आहे. एका बाजूला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हळुवार पावले उचलत असताना शिंदे यांच्या कळपात एकेक आमदार वाढत असल्याचे चित्र आहे.*

शिंदे यांना दिलेली परतीची हाक आता हवेत विरली आहे.परतीचे दोर कापले गेले आहेत.त्यामुळे शिंदे यांच्यासह सगळ्या बंडखोरांना समोर येणाऱ्या स्थितीशी लढावे लागेल,त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आता लढाई तांत्रिक आणि कायद्याच्या पातळीवर लढली जाईल असे दिसते त्यामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून असलेल्या फडणवीस यांचा हिरमोड झाला असेल. हा आठवडा किंवा पंधरा दिवस तरी या नाट्याचा शेवट होईल असे वाटत नाही. एकनाथ शिंदे यांना दोन्ही काँग्रेससोबत काडीमोड घेऊन भाजपशी घरोबा करायचा आहे हे आता लपून राहिलेले नाही. हिंदुत्ववाद किंवा दोन्ही काँग्रेसवरील राग ही शिंदे आणि सहकाऱ्यांनी पुढे केलेली ढाल असली तरी या सगळ्यांचा मूळ विरोध उद्धव ठाकरे यांच्याच नेतृत्वाला असल्याची बाबही आता हळूहळू समोर यायला लागली आहे.शिंदे यांच्या सोबत जाणाऱ्या सेना आमदारांना आपण नेमके काय करीत आहोत याची स्पष्ट जाणीव असल्याचे दिसते.ताकाला जाऊन भांडे पुढे केले तर कोणती तीव्र प्रतिक्रिया येईल याची भीती असल्याने काहीकाळ भांडे लपवले गेले मात्र संजय सिरसाट यांच्या पत्रातून बंडखोर आमदारांच्या मनात ठाकरे आणि मातोश्री यांच्याबाबत नेमके काय शिजतेय हे बाहेर आले आहे.

उद्धव ठाकरे यांचे परवाचे फेसबुक लाईव्ह आणि आजचे जिल्हा प्रमुखांना केलेले संबोधन ऐकल्यावर शिंदे गटाचा विरोध जर ठाकरे यांना नसता तर तश्या प्रतिक्रिया गुवाहाटी वरून यायला हव्या होत्या परंतु एकाही बंडखोर किंवा खुद्द शिंदे यांनीही उद्धव ठाकरे यांच्या संदर्भात आपली बाजू स्पष्ट केली नाही.उलट माध्यमातून ठाकरे आणि मातोश्री यांच्या बाबत जे काही झिरपत आहे त्याकडे कानाडोळा करून मूकसंमती दर्शवली आहे.याचा अर्थ स्पष्ट आहे हे बंड थेट उद्धव ठाकरे यांच्या विरुद्ध आहे,हिंदुत्व,निधी हे सगळे बहाणे आहेत हे लक्षात यायला लागले आहे.एकाचवेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर आमदार ठाकरेंच्या विरुद्ध गेल्यावर एरवी रस्त्यावर राडा करणारे शिवसैनिक फारसे आक्रमक झाले नाहीत.किरकोळ घटना वगळता जणू सर्वांच्या मनासारखे घडत आहे असा संदेश यातून जात आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हापासून तसेही त्यांचे संघटनेकडे लक्ष कमी झाले आहे.गावोगाव आक्रमक शिवसैनिकाला कोणताही कार्यक्रम सेनानेते देऊ शकले नाहीत त्यामुळे प्रमुख पदाधिकारी वगळता इतरांच्या मनात खदखद आहे. निवडणुकांच्या राजकारणातून सामान्य शिवसैनिक




## आनंदी सकाळ

# शाश्वत संस्कारांनी मने समृद्ध

भारतीयांचा विचारच मुळी 'सोऽहं' अशा प्रगाढ अनुभूतीने सुरू होतो. त्याच्या अभावामुळे पाश्चात्यांनी मानसशास्त्र या स्तरापर्यंत विकसित न करता, ते (मनाच्या) अध:पतनाशी, अवचेतनेशी जास्त जोडले आहे. हजार-अकराशे वर्षांपूर्वी संतांनी सर्व रचना आधी सांगितल्या, मग लिहिल्या. उत्स्फूर्तपणे, कळवळ्याने, पोटतिडकीने त्यांच्या कंठातून प्रस्फूटित झालेल्या शब्दांत युग, त्रिकाळ बोध, अध्यात्म-आत्मानुभूती, मूल्ये, आदर्श दैन्य, वेदना, तत्त्वज्ञान असा अर्थाचा विराट विस्तार सामावलेला होता. ते सर्व जाणून, उमजून घेण्याची मानसिक क्षमता त्या काळच्या सर्वसाधारण जनतेपाशी होती. परिस्थिती गरिबीची होती; पण मने गरीब नव्हती. त्यांचे भाव, विचार, संकल्पना, दृष्टिकोन शाश्वत संस्कारांनी बनलेले असल्यामुळे, मने समृद्ध होती, सखोल होती. आज या सर्वांचे महत्त्व नाकारल्यामुळे आमचा भावबोध उथळ, क्षणिक, बिनबुडाचा झाला आहे .

# श्रद्धेचा अंधार की बुद्धीचा प्रकाश?



आजच्या प्रगत युगात सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात हे मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर सिद्ध करून दाखवले आहे. वैज्ञानिक प्रगतीची हत्यारे वापरण्यात त्या तुलनेत भारत किमान दोनशे वर्ष मागे असल्याचे लक्षात येते. आपण जगाच्या स्पर्धेत एवढे मागे का राहिलो? हे प्रश्न जुन्या लोकांना पडले नसतील मात्र आताच्या पिढ्यांना त्याने भंडावून सोडले आहे. विज्ञानाच्या, संशोधनाच्या क्षेत्रात जे चमत्कार केले जातात ते आपल्या देशात एवढ्या वर्षात किती झाले हे तपासले तर आपल्या हाती मोठी निराशा येते. वैद्यकीय शास्त्र असो की उद्योग क्षेत्र असो जगभरात त्यात झालेली प्रगती बघितली की भारतीय माणूस तोंडात बोटे घालतो.

आपल्या देशात जिज्ञासूवृत्ती विकसित होण्याचा दर अतिशय कमी आहे. प्रश्न आणि चिकित्सा हे जिज्ञासू वृत्तीचे पालक असतात. जिथे हे पालक कमजोर असतात तिथे जिज्ञासा वाढीस बंधने येतात. आपल्या समाजात देव, धर्म, अध्यात्म आणि कथित भारतीय संस्कृती यांचे जे अवास्तव स्तोम माजवले गेले आहे, त्याचा परिणाम इथल्या पिढ्यांच्या बौद्धिक घडणीवर एवढा झालाय की बालपणात जे शिकवले त्याहीपेक्षा काहीतरी वेगळे घडू शकते किंवा आपण घडवू शकतो हा आत्मविश्वास लुळा पडला आहे. जिथे चोवीस तास सगळे काही देवाच्या नावाने खपवले जाते तिथे बुद्धीला सामर्थ्य येणे कठीण असते.आपल्याकडे एवढी वर्ष हेच झाले आहे.

जगभर देव, धर्म आणि अध्यात्म नाही असे नाही मात्र ते लोक त्याला चिकटून बसत नाहीत. कधीतरी आला चेव तर केला देव असे करतात. आपण मात्र अशा बाबी फारच गंभीरपणे घेतो. त्यात झोकून आयुष्य बरबाद करतो. ग्रंथप्रामाण्य किंवा धर्मगुरूंचे शब्दप्रामाण्य जे स्वीकारतात ते आपल्याच हाताने आपल्या मेंदूला कुलूप लावतात आणि चावी गंगेत फेकून देतात. मग सांगा ही कुलूपे कशी उघडली जातील? श्रद्धा, अकिदा ही एकूणच मानवीय प्रगतीमधील मोठा अडसर ठरत आली आहे. श्रद्धेने तुमचे मानसिक समाधान होईल, परंतु मूळ प्रश्न सुटणार नाहीत. श्रद्धा, अकिदा अंधाराचे नाव आहे. बुद्धी, अकल प्रकाशाचे काम करतात. श्रद्धा आधी कोणतीही बाब मानायला शिकवते तर बुद्धी आधी जाणण्याची प्रेरणा देते.


व्यक्तिगत असो वा सार्वजनिक जीवनातील कोणतीही समस्या श्रद्धेने सोडवण्याचा प्रयत्न केला तर व्यक्ती अध्यात्माच्या खोल दरीत कोसळतो, प्रसंगी गटांगळ्या खातो मात्र सत्य त्याला सापडत नाही.

# मातोश्री आणि वर्षातला फरक

**काही दिवसांपूर्वी झालेल्या राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडीवर कुरघोडी करीत भाजपने विशेषतः विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी सातवा उमेदवार निवडून आणला.**

सत्ताधारी पक्ष सत्तेवर असेपर्यंत बलवान असतो सगळ्या आर्थिक नाड्या त्यांच्या हातात असतात,वाट्टेल ती पदे ते निर्माण करू शकतात असे सगळे असतानाही त्याचे व्यवस्थापन करण्यात सरकारचे प्रमुख म्हणून उद्धव ठाकरे कमी पडले असे म्हणता येईल.गेल्या दोन अडीच वर्षात मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांचा सर्वात मोठा दुर्गुण उघडा पडला, ज्याचा अनुभव पहिल्यांदा सेनेसह महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला तो आहे,कुणालाही वेळ न देणे,फोन न घेणे.

बाळासाहेब ठाकरे हयात असताना मातोश्री या शब्दाचा आणि स्थळाचा प्रचंड दबदबा होता.लोकांच्या नजरेत ती वाघाची गुहा होती त्यामुळे या गुहेविषयी कुतूहल होते आणि गैरसमज सुद्धा.त्यांच्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या खांद्यावर ती जबाबदारी आली. हा वारसा स्वीकारताना उद्धव याना प्रत्यक्षात चांदा ते बांदा अवघा



महाराष्ट्र पायदळी तुडवण्याची गरज पडली नाही त्यामुळे आधीचा प्रभाव घेऊन त्यांनी स्वतःभोवती कोष विणला आणि त्यात उध्दवसाहेब बंदिस्त झाले. साहेब विसावले की भवताल बडव्यांची गर्दी होते तेच ठाकरेंचे झाले.अगदी कुणालाही साहेबांनी भेटण्याची गरज नाही हा सल्ला त्यांनी ऐकला आणि सेनेच्या आमदारांना सुद्धा साहेबांची भेट दुरापास्त झाली.

उद्धव ठाकरे फक्त पक्षप्रमुख होते तोवर ते भेटत नाहीत ही ओरड होतीच मात्र सेना वगळता इतरत्र त्याची फारशी चर्चा होत नव्हती आता ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत ,त्यांचा हा अवगुण अलीकडे सर्वपक्षीय नेते अनुभवताहेत. त्यांचा संपर्क भरपूर आहे पण आभासी,थेट नव्हे.ते नियमित नेत्यांशी बोलतात मात्र ते सेनानेते आणि सल्लागार असतात.अगदी सेनेचे उपनेते हा जो काही प्रकार आहे त्यावर नियुक्त लोकांशीही ते बोलत नाहीत.त्यांचा फोन घेत नाहीत.त्यांना कॉल केल्यावर आधी दरबारी लोकांकडे कॉल फिरत राहतो शेवटी कंटाळून नेते,उपनेते कॉल कट करून साहेबांचे कार्यबाहुल्य वाढल्याचे समाधान करून घेतात असे सेनेत बोलले जाते. हे सगळे संदर्भ राज्यसभा निवडणुकीच्या यश,अपयशाला आहेत .छोटे पक्ष आणि अपक्ष यांच्याशी त्यांनी थेट संवाद ठेवला असता तर सेनेचा सातवा संजय पराभूत होण्याचे काहीच कारण नव्हते.मिलींद नार्वेकर,अनिल परब,अनिल देसाई किंवा अनिल परब,सुनील प्रभू ,रवींद्र वायकर इत्यादी महानगरीय नेत्यांनी दिलेला प्लॅन साहेबांनी स्वीकारला आणि हात दाखवून अवलक्षण करून बसले.

## ।। अभंगवाणी ।।



न राहे रसना बोलतां आवडी ।
पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥१॥
मानेल त्या तुम्ही अइका स्वभावें ।
मी तों माझ्याभावें अनुसरलें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### कमळीच्या नादाला लागून वाया गेलात तुम्ही : सचिन अहिर

। मुंबई। महाईन्यूज ।

शिवसेनेचे बंडखोर आमदार एकनाथ शिंदे यांनी ४६ हून आमदारांसह बंड केल्याने,त्याच पडसाद राज्यात उमटत आहे.त्या पार्श्वभूमीवर राज्यातील अनेक ठिकाणी शिवसेने मधील प्रमुख पदाधिकाऱ्यां च्या बैठका मेळावे होत आहे.त्याच दरम्यान आज पुण्यात विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांच्या नेतृत्वाखाली मेळावा पार पडला. त्यावेळी एकनाथ शिंदे यांच्यासह बंडखोर सर्व आमदारांचा खरपूस समाचार घेतला. यावेळी सचिन अहिर म्हणाले की,'काय होता तुम्ही काय झाला, तुम्ही कमळीच्या नादाला लागून वाया गेला तुम्ही अशी अवस्था या लोकांची आज झालेली आहे.अशा शब्दात बंडखोर आमदारवर त्यांनी निशाणा साधला.

### आमच्याकडे आवश्यकतेपेक्षा जास्त संख्याबळ

# उद्धव ठाकरेंनी राजीनामा द्यायचा की नाही हे त्यांनी ठरवावं !

## उद्धव ठाकरेंच्या भाषणानंतर एकनाथ शिंदेंची पहिली प्रतिक्रिया

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यामुळे महाविकास आघाडी सरकार अडचणीत आले आहे. त्यांची समजूत घालण्यासाठी आणि महाविकास आघाडी सरकार वाचवण्यासाठी राज्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबत ३० पेक्षा जास्त आमदार असून ते सध्या आसाममधील गुवाहाटी येथे आहेत. एकीकडे राजकीय तर्कवितर्क लावले जात असताना दुसरीकडे एकनाथ शिंदे यांनी “आम्ही बाळासाहेबांच्या विचारांवर विश्वास ठेवणारे कार्यकर्ते आहोत”, अशी प्रतिक्रिया दिली आहे. “आम्ही सर्व आमदार आता एकत्र आहोत. आम्ही बाळासाहेबांच्या



विचारांवर विश्वास ठेवणारे कार्यकर्ते आहोत. आम्हा सर्वांची तीच भावना आहे. आमच्याकडे आवश्यकतेपेक्षा जास्त आमदारांचे संख्याबळ आहे”, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

दरम्यान यावेळी बोलताना एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रीपदाविषयी देखील प्रतिक्रिया दिली आहे. “मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी राजीनामा द्यायचा की नाही याचा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. आम्ही पुढची दिशा

> “एकनाथ शिंदे यांच्यासोबत ३० पेक्षा जास्त आमदार असून ते सध्या आसाममधील गुवाहाटी येथे आहेत. एकीकडे राजकीय तर्कवितर्क लावले जात असताना दुसरीकडे एकनाथ शिंदे यांनी “आम्ही बाळासाहेबांच्या विचारांवर विश्वास ठेवणारे कार्यकर्ते आहोत”, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

> “मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी राजीनामा द्यायचा की नाही याचा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. आम्ही पुढची दिशा ठरवण्यासाठी संध्याकाळी एक बैठक आयोजित केली आहे. ती बैठक झाल्यावर तुम्हाला त्याचा निर्णय कळवला जाईल”, असे ते म्हणाले. शिवसेना आमदाराला मारहाण झाल्याचा दावा केला जात असताना त्यांनी हा दावा फेटाळून लावला आहे.

ठरवण्यासाठी संध्याकाळी एक बैठक आयोजित केली आहे. ती बैठक झाल्यावर तुम्हाला त्याचा निर्णय कळवला जाईल”, असे ते म्हणाले. शिवसेना आमदाराला मारहाण झाल्याचा दावा केला जात असताना त्यांनी हा दावा फेटाळून लावला आहे. “गुजरातमध्ये कोणत्याही आमदारांना मारहाण केली नाही. त्यांना परत पाठवताना कार्यकर्तेही त्यांच्या बरोबर दिले होते”, असेही ते म्हणाले.

दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे विधानसभा बरखास्तीच्या दिशेने जात असल्याचे संकेत शिवसेनेचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी दिले आहे. “महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींचा प्रवास विधान सभा बरखास्तीच्या दिशेने,” असं ट्वीट संजय राऊतांनी केलं आहे. एकनाथ शिंदेंनी आपल्यासोबत ४० आमदार असून त्यापैकी ३३ आमदार हे शिवसेनेचे असल्याचं आज सकाळी सुरतमधून गुवहाटीमध्ये पोहोचल्यानंतर जाहीर केलं होतं. त्यानंतरपासूनच महाराष्ट्रातील सरकार अल्पमतात असल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. त्यानंतरच त्यांनी हे ट्वीट केलं होतं. त्यांच्या या ट्विटनंतर अनेक राजकीय चर्चांना उधाण आले आहे. तर दुसरीकडे आज संध्याकाळी एकनाथ शिंदे नेमकी काय भूमिका घेणार? ते पक्ष सोडणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बंडखोर आमदारांच्या मतदार संघात गृह खात्याकडून हायअलर्ट जारी

। मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर राज्यातील राजकीय घडामोडींना मोठा वेग आला आहे. परंतु राज्यात सध्या शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये प्रचंड रोष आणि आक्रमकपणा दिसून येत आहे. या बंडखोर आमदारांविरोधात आणि भाजपविरोधात शिवसैनिकांकडून राज्यभर आंदोलन करण्यात येत आहे. तसेच काही नेत्यांची पुतळे देखील जाळण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे घोषणा देखील करण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर बंडखोर आमदारांच्या मतदार संघात गृह खात्याकडून हायअलर्ट जारी करण्यात आला आहे.

राज्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गृह खात्याने महत्त्वाच्या सुचना दिल्या आहेत. त्यासंदर्भात टविट देखील केलं आहे. मुंबई आणि एमएमआरडीए भागात विशेष सूचना देण्याचे आदेश गृहखात्याने दिले आहेत. बंडखोर आमदारांबाबत आणखी नाराजी



वाढण्याची शक्यता असल्याचं लक्षात घेत गृह खात्याकडून आदेश जारी करण्यात आले आहेत.

राज्यात एखादा प्रसंग उद्भवल्यास त्याला सामोरे जाण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सतर्क आणि सज्ज असल्याची माहिती गृहखात्याने ट्विटरवरून दिली आहे. राज्याच्या विविध भागात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, शिवसेनेच्या १५ आमदारांना केंद्रीय सुरक्षा देण्यात आली आहे. आमदारांच्या घराबाहेर सीआरपीएफचे जवान तैनात करण्यात आले आहेत. राज्यातील शिवसैनिक आक्रमक झाले असून शिंदे गटातील आमदारांची कार्यालये फोडण्यात आली आहेत. तसेच आमदारांच्या घराबाहेर सुद्धा निदर्शने करण्यात येत आहे. यामुळे आमदारांना सुरक्षा पुरवण्यासाठी केंद्रीय गृह सचिवांकडे पत्रव्यवहार केला होता. यानंतर केंद्राकडून आमदारांच्या घराबाहेर सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

घराबाहेरील सुरक्षा व्यवस्था हटवली असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला होता. त्यानंतर राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आमदारांची सुरक्षा काढून घेतली नाही असे सांगितले आहे. यानंतर आमदारांच्या घराबाहेर आता केंद्राकडून सुरक्षा पुरवण्यात आली आहे. तर राज्यातील पोलिसांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिंदे गटाला सत्ता परिवर्तन हवं, त्यामुळे हे प्रयत्न सुरू – शरद पवार

। मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

राष्ट्रपतीची निवडणूक असल्यामुळे मी येथे आलो आहे. महाराष्ट्रात ज्यापद्धतीने परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे राज्यातील परिस्थितीचा निकाल हा दिल्लीत नाही तर राज्यात घ्यायचा आहे. शिवसेनेचा एक गट हा आसाममध्ये गेला आहे. त्यांच्याकडून एक स्टेटमेंट समोर आली आहे. या स्टेटमेंटमधून समजतंय की, त्यांना सत्ता परिवर्तवन हवी आहे. सत्ता परिवर्तनासाठी त्यांचा हा प्रयत्न सुरू आहे. शिवसेनेची ही ख्याती आहे की, गेलेले बंडखोर परत आल्यानंतर त्यांच्या भूमिकेत बदल होईल. ज्या सगळ्यांना मदत करणारे जे पक्ष आहेत. त्यांची भूमिका महाविकास आघाडी सरकारला पूर्णपणे पाठिंबा देण्याची आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार म्हणाले.

जर राज्यात राष्ट्रपती राजवट आली तर भाजपने एवढं केलं त्याचा फायदा काय? असा प्रश्न त्यांनी



उपस्थित केला आहे. बंडखोरांनी गुजरात आणि आसाम हे दोन राज्य निवडले आहेत त्या राज्यात भाजपचे सरकार आहे. बंडखोरांकडे संख्याबळ असेल तर ते गुवाहटीत का थांबले आहेत?, असं शरद पवार म्हणाले.

### आमदार नक्कीच परत येतील...

संजय राऊत यांनी ४० मृतदेह परत येतील हे विधान मी ऐकलं नाही पण गेलेले आमदार नक्कीच परत येतील असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला आहे. आजही आमची आघाडी असून आघाडी टिकवण्यासाठी आमचा प्रयत्न असेल, उद्धव ठाकरे यांना आमचा पाठिंबा असेल, असं शरद पवार म्हणाले आहेत.

### यशवंत सिन्हा उमेदवारीसाठी अर्ज दाखल करणार

राष्ट्रपती निवडणुकीसंदर्भाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार हे दिल्लीत दाखल झाले आहेत. प्रत्येक राज्यात राष्ट्रपदासाठी जे उमेदवार उभे राहणार आहेत. यासंदर्भात महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. परंतु या बैठकीचं शेड्यूल काय असेल आणि त्यांच्यासोबत कोण असणार?, याबाबत आम्ही लवकरच निर्णय घेणार आहोत. यशवंत सिन्हा उमेदवारी पदासाठी उद्या अर्ज दाखल करणार असून आम्ही आज येथे उपस्थित राहिलो आहोत. यावेळी समाजवादी पार्टी आणि इतर पक्षांचे नेते उपस्थित होते. त्यामुळे आता पुढची रणनिती आखली जाणार आहे.

**शॉर्ट न्यूज »**

### बंडखोर आमदारांना केंद्राची 'वाय प्लस' सुरक्षा

।मुंबई। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

एकनाथ शिंदेंसोबत शिवसेनेशी बंडखोरी करून गुवाहाटीमध्ये थांबलेल्या शिवसेना आमदारांपैकी काहींच्या कार्यालयांची तोडफोड झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने जवळपास १५ बंडखोर आमदारांना वाय प्लस दर्जाची सुरक्षा पुरवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर महाराष्ट्रात शिवसैनिक आक्रमक झाले असून अनेक कार्यकर्ते रस्त्यावर उतरून निदर्शने करीत आहेत.

# शिवसेना आमदारांच्या बंडामागे भाजपाचा हात नाही!

## भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी शिवसेनेच्या आरोपांना प्रत्युत्तर

।मुंबई। महाईन्यूज। प्रतिनिधी।

एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या शिवसेनेच्या ३७ आमदारांच्या बंडामागे भाजपाचा हात असल्याचे आरोप वारंवार शिवसेनेकडून केले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर आता य आरोपांना भाजपाकडून प्रत्युत्तर देण्यास सुरूवात केली आहे. त्यानुसार, आज भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी शिवसेनेच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. "भाजपाचा कोणताही हात नसून, भारतीय जनता पार्टीला दोष देण्याचे दुर-दुर पर्यंत कारण नाही. त्याशिवाय, भारतीय जनता पार्टीच्याबाबत अशाप्रकारचे



अपशब्द काढून निश्चितपणे तुम्ही चुकीच्या दिशेने जात आहात", असे त्यांनी म्हटले.

प्रसारमाध्यमांशी बातचित करताना भाजपा नेते सुधिर मुनगंटीवार यांनी शिवसेनेला प्रत्युत्तर दिले. यावेळी ते म्हणाले की, "भारतीय जनता पार्टीला दोष देण्याचे दुर-दुर पर्यंत कारण नाही. नाचता येईना अंगण

भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी शिवसेनेच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहेत. "भाजपाचा कोणताही हात नसून, भारतीय जनता पार्टीला दोष देण्याचे दुर-दुर पर्यंत कारण नाही. त्याशिवाय, भारतीय जनता पार्टीच्याबाबत अशाप्रकारचे अपशब्द काढून निश्चितपणे तुम्ही चुकीच्या दिशेने जात आहात", असे त्यांनी म्हटले.

वाकडे... तुम्हाला तुमचे आमदार सांभाळता आले नाही, आणि सांगायचे भारतीय जनता पार्टीने फुस लावली. थोडी तरी जनाची नाही तर, मनाची ठेवा. अरे तुमची चुक झाली असेल, तुम्ही जर गर्वात असाल, अहंकारात असाल, घमेंड तुमच्यात भरभरून होती. त्यामुळे आमदारांनी काही भुमिका घेतली असेल, दोष भारतीय जनता पार्टीला कशाला देताय."

"कोणाच्या नावाने कोणी मत मागितली ही २०१९च्या निवडणुकीत सर्वांनी पाहिले आहे. आदित्य ठाकरे यांनीही कोणा-कोणाच्या नावानी वरळी विधानसभा मतदारसंघात मते मागितली हे साऱ्या महाराष्ट्राच्या जनतेला माहिती आहे. त्यामुळे कोणी कोणाच्या नावाने मते मागायची. जनतेनी कोणाला मते द्यायची. हा जनतेचा अधिकार आहे. कधीतरी दानवांचा संहार करण्यासाठी भगवान विष्णू वराह अवतारात आले होते. आता तुम्ही मान्यच केलेय की, चाळीस वराह तिकडे गेले. तर एका वराहने पृथ्वीला वाचवले तर, ४० वराह महाराष्ट्र वाचवतील. तुम्ही रोज अतिशय निम्न शब्दांमध्ये या महाराष्ट्राच्या राजकारणाचा स्थर हा कधी नवे इतक्या खाली नेण्याचा प्रयत्न करतात.", असे त्यांनी म्हटले. बंडखोरांना सुरक्षा दिली जाते पण काश्मिरी पंडितांना सुरक्षा केंद्राकडून दिली जात नाही असे आदित्य ठाकरे यांनी आजच्या मेळाव्यात म्हटले. याबाबत मुनगंटीवार यांना प्रश्न विचारला असता त्यांनी सरकार जात असताना आता काश्मिरी पंडित आठवेल, स्वातंत्र्यवीर सावरकर आठवतील, सरजे उस्मानी वाईट होताहेत हे आठवेल, अशा अनेक गोष्टी आठवतील.

# बाळासाहेबांची शिवसेना वाचविण्यासाठी आम्हाला मरण जरी आलं तरी बेहत्तर..,

## शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदेंचं राऊतांना प्रत्युत्तर

।नवी दिल्ली। महाईन्यूज। वृत्तसंस्था।

शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांसाठी आणि बाळासाहेबांची शिवसेना वाचविण्यासाठी आम्हाला मरण जरी आलं तरी बेहत्तर.... तसे झाल्यास आम्ही सारे आमचं भाग्य समजू... असं प्रत्युत्तर एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांना दिलं आहे.

शिवसेना आणि शिंदे गटामध्ये आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. तर मुंबईमध्ये शिवसेनेकडून जाहीर मिळावे घेतले जात आहे. यावेळी आसामच्या रॅडिएन्स ब्लू हॉटेलमध्ये आहेत, जी ४० लोकं आहेत, ती माणसं नाहीत, ती जीवंत प्रेत आहेत, त्यांच्या बॉड्या इकडे येणार आहेत. कारण त्यांचा आत्मा मेलेला असेल. ही चाळीस लोकं जेव्हा उतरतील तेव्हा ते मनाने जिवंत नसतील, असं संजय राऊत म्हणाले होते. त्यावर एकनाथ शिंदे यांनी ट्विट करत राऊतांवर एक प्रकारे पलटवार केला आहे.



शिवसेना आणि शिंदे गटामध्ये आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहे. तर मुंबईमध्ये शिवसेनेकडून जाहीर मिळावे घेतले जात आहे. यावेळी आसामच्या रॅडिएन्स ब्लू हॉटेलमध्ये आहेत, जी ४० लोकं आहेत, ती माणसं नाहीत, ती जीवंत प्रेत आहेत, त्यांच्या बॉड्या इकडे येणार आहेत. कारण त्यांचा आत्मा मेलेला असेल. ही चाळीस लोकं जेव्हा उतरतील तेव्हा ते मनाने जिवंत नसतील, असं संजय राऊत म्हणाले होते. त्यावर एकनाथ शिंदे यांनी ट्विट करत राऊतांवर एक प्रकारे पलटवार केला आहे.

हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांसाठी आणि बाळासाहेबांची शिवसेना वाचविण्यासाठी आम्हाला मरण जरी आलं तरी बेहत्तर.... तसे झाल्यास आम्ही सारे आमचं भाग्य समजू.., असं देखील एकनाथ शिंदे म्हणाले. दरम्यान, तुम्ही एका बापाचे असाल तर राजीनामे द्या. निवडणुकीला आमच्या समोर उभे राहा. नजरेला नजर भिडवून समोर या, असे आव्हान संजय राऊत यांनी बंडखोर आमदारांना केले आहे. तसेच, एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना बाळासाहेब ठाकरे असे नाव देण्यात आले. यावरूनही संजय राऊतांनी बंडखोर आमदारांचा समाचार घेतला होता. परंतु एकनाथ शिंदे यांनी एक ट्विट करत त्यांची भूमिका मांडली आहे.

### काय म्हणाले शिंदे?

मुंबई बाँबस्फोट घडवून निष्पाप मुंबईकरांचा जीव घेणाऱ्या दाऊदशी थेट संबंध असणाऱ्यांना हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना समर्थन कशी करू शकते...? यालाच विरोध म्हणून उचललेलं हे पाऊल; आम्हा सर्वांना मृत्यूच्या दारात घेऊन गेले तरी बेहत्तर., असं ट्विट एकनाथ शिंदे यांनी केलं आहे.

# अमेरिकेत बंदूक हिंसाचारप्रतिबंधक विधेयक मंजूर!

।एपी, वॉशिंग्टन। महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

अमेरिकेतील बहुप्रतीक्षित बंदूक हिंसाचार प्रतिबंधक विधेयकावर अध्यक्ष जो बायडेन यांनी शनिवारी स्वाक्षरी केली. अमेरिकेत बेछुट गोळीबाराच्या अनेक घटना आतापर्यंत घडल्या आहे. अलिकडेच टेक्सास येथील शाळेत झालेल्या बेछुट गोळीबारात दोन शिक्षकांसह १९ छोटय़ा विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या घटनांच्या प्रतिबंधासाठी वैधानिक तरतूद करण्याच्या मागणीचा दबाव सरकारवर वाढला होता.या पार्श्वभूमीवर सिनेटरच्या द्विपक्षीय गटास संमत असलेले विधेयक मंजूर होण्याचा मार्ग मोकळा झाला. "यामुळे निष्पाप जीव वाचतील," असे उद्गार बायडेन यांनी यावेळी काढले. बायडेन यांनी सांगितले, की या दुर्घटनांमुळे ठोस कृती करण्याची गरज होती. तशी व्यापक मागणीही होत होती. आज आम्ही त्या दिशेने पाऊल टाकले आहे.

गुरुवारी सिनेटने मंजुरी दिल्यानंतर प्रतिनिधी सभागृहाने शुक्रवारी या विधेयकास अंतिम मंजुरी दिली. शनिवारी युरोपमधील दोन शिखर परिषदेसाठी वॉशिंग्टन सोडण्यापूर्वी अध्यक्ष बायडेन यांनी त्यास मंजुरी दिली.

या कायदेशीर तरतुदीमुळे बंदूक खरेदी करणाऱ्या अल्पवयीनांची पार्श्वभूमी, त्यांच्या माहितीची खातरजमा करण्याची प्रक्रिया अधिक कठोर होणार आहे. त्यामुळे बेछुट हिंसाचार करण्यासाठी अग्निशस्त्रे सहज उपलब्ध असणार नाहीत.

धोकादायक वाटणाऱ्या व्यक्तींकडून ही शस्त्रे जप्त करण्याचे प्रतिबंधक कायदे तयार करण्याचे अधिकार संबंधित राज्यांना प्राप्त होण्यास मदत होईल. यासाठी १३ अब्ज डॉलरची तरतूद न्यू टाऊन, कनेक्टिकट, पार्कलॅण्ड, फ्लोरिडासारख्या ठिकाणच्या शाळांत बेछुट गोळीबारात हिंसाचारग्रस्त शाळांतील मानसोपचार प्रकल्प राबवण्यासाठी करण्यात आली. बायडेन यांनी सांगितले, की सिनेटरच्या द्विपक्षीय गटाने केलेली तडजोड माझ्या संपूर्ण अपेक्षेनुसार झाली नसली तरी जी पावले उचलावीत असे दीर्घकाळापासून मी आवाहन करत आहे, त्या बहुसंख्य बाबींचा समावेश आहे. ज्यामुळे निष्पाप जीव वाचतील. अजून या दिशेने बरेच काही करणे बाकी आहे. हिंसाचाराची झळ पोहोचलेल्या नागरिकांसाठी ११ जुलैला एक विशेष कार्यक्रम होणार आहे.

# लाल सिंग चड्ढामधील 'फिर ना ऐसी रात आएगी' गाणे प्रदर्शित

'लाल सहि चड्ढा' चत्रिपटातील 'फरि ना ऐसी रात आएगी' हे मोस्ट अवेटेड गाणे अखेर प्रदर्शति झाले आहे. हे गाणे ऐकल्यानंतर ते आतापर्यंतचे सर्वात भावपूर्ण संगीत आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. प्रीतमने संगीतबद्ध केलेले हे गाणे अरजिति सगिने गायले आहे. अलीकडेच आमरि खानने सोशल मीडियावर करीना कपूर खानचा एक व्हडिओि शेअर केला ज्यामध्ये करीना या चत्रिपटातील 'फरि ना ऐसी रात आएगी' हे गाणे दशकातील सर्वोत्कृष्ट गाणे असल्याचे सांगते आहे.आमरि खानने टी-सीरीजच्या सोशल मीडयि हँडलवर काही अत्यंत प्रतभिावान भारतीय नरि्मात्यांसह लाइव्ह जात हे गाणे लॉन्च केले, यावेळी त्याने प्रेम, वयिोग आणा तिळमळ या मानवी भावनांवर वर चर्चा केली. काल आमरि खानने करीना कपूर खानचा एक व्हडिओि देखील शेअर केला ज्यामध्ये अभनिेत्रीने 'फरि ना ऐसी रात आएगी'ला दशकातील सर्वोत्कृष्ट गाणे संबोधले. दरम्यान, लाल सगि चड्ढाची या आधीची दोन गाणी – 'कहानी' आणा 'मैं की करां?' संगीत रसकिांच्या हृदयाला भडिली आहेत. चत्रिपटाच्या नरि्मात्यांनी गायक, संगीतकार, तंत्रज्ञ आणगिीतकार यांच्या नावावर दोन्ही गाणी म्युझकि व्हडिओिशवािय रलिीज केली आहेत.



# वीणा जगतापची 'ठिपक्यांची रांगोळी' मालिकेत एन्ट्री


सध्या स्टार प्रवाह वाहिनीवरील 'ठिपक्यांची रांगोळी' या मालिकेला अनेक प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत आहे. अल्पावधीतच या मालिकेने बऱ्यापैकी लोकप्रियता मिळवलेली आहे. या मालिकेतील खोडकर, निरागस अपूर्वा आणि शिस्तबद्ध , हुशार शशांक यांची सुंदर केमिस्ट्री दाखवण्यात आली आहे. आता येत्या काळात या कानेटकरांच्या कुटुंबामध्ये नव्या पात्राची एन्ट्री होणार आहे. या नव्या पात्राची भूमिका अभिनेत्रा वीणा जगताप साकारणार आहे. या नव्या पात्राचे नाव मालिकेत अवंतिका कानेटकर चौधरी असं आहे. अवंतिका ही विनायक कानेटकरांची मुलगी असून तिने प्रेमविवाह केल्यामुळे तिला कानेटकर कुटुंबापासून लांब करण्यात आले होते. लग्नाच्या बऱ्याच वर्षांनंतर अवंतिका कानेटकर पुन्हा आपल्या कुटुंबाशी जोडली जाणार आहे.





# सलमान खानबद्दल शाहरुखचं मोठं वक्तव्य,

बॉलिवूडचा बादशाह म्हणून ओळखला जाणारा अभिनेता शाहरुख खानच्या बॉलिवूड कारकिर्दीला ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्तानं नुकतंच त्यानं सोशल मीडियावर लाइव्ह सेशन केलं होतं. या लाइव्ह सेशनमध्ये त्यानं चाहत्यांच्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरं दिली आहेत. यात त्याला सलमान खानबद्दलही प्रश्न विचारण्यात आला होता आणि त्यानं या प्रश्नाचं उत्तर देताना सलमानबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे. यासोबतच आतापर्यंत सलमानसोबत काम करताना काय अनुभव आला हे देखील सांगितलं. शाहरुखच्या एका चाहत्यानं त्याला सलमान खानसोबत काम करण्याचा अनुभव विचारला होता. या प्रश्नाचं उत्तर देताना शाहरुख खान म्हणाला, "सलमान खानसोबत काम करताना मला कोणताही अनुभव नाही. फक्त प्रेम आहे, आनंद आहे, मैत्री आहे आणि भावासारखं नातं आहे. त्याच्यासोबत काम करणं नेहमीच उत्तम होतं. पण आमची मागची दोन वर्षं खूपच खास आहेत कारण तो माझ्या चित्रपटांमध्ये दिसला आणि मी देखील त्याच्या चित्रपटात दिसणार आहे." सलमानबद्दल बोलताना शाहरुख पुढे म्हणाला, "आम्ही दोघांनीही 'करण अर्जुन' व्यतिरिक्त कोणताही मोठा चित्रपट केलेला नाही. या चित्रपटातही आम्ही फक्त ४-५ दिवस एकत्र शूटिंग केलं होतं. पण लवकरच मी त्याच्या 'टायगर'मध्ये दिसणार आहे. जसं तो माझ्या 'झीरो'मध्ये दिसला होता. सलमान माझ्या कुटुंबाचा भाग आहे आणि मला माझ्या भावासारखा आहे. फक्त आम्हाला हे माहीत नाही की आमच्यापैकी नक्की मोठा भाऊ कोण आहे.




# बायकोसाठी कायपण!

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग त्याच्या दमदार अभिनयासोबतच त्याच्या अतरंगी अंदाजासाठी देखील ओळखला जातो. इतरांपेक्षा नेहमीच काहीतरी वेगळं करणारा रणवीर सिंग त्याच्या याच अंदाजामुळे सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असतो. लवकरच रणवीर बियर ग्रील्ससोबत 'रणवीर वर्सेज वाइल्ड' शोमध्ये दिसणार आहे. काही दिवसांपूर्वीच त्यानं या शोचा टीझर सोशल मीडियावर शेअर केला होता. त्यानंतर आता या शोचा ट्रेलर समोर आला आहे. ज्याची सोशल मीडियावर जोरदार चर्चा होताना दिसत आहे. या ट्रेलरमध्ये रणवीर सातत्यानं दीपिकावरील प्रेम व्यक्त करत ॲडव्हेंचर करताना दिसत आहे. ट्रेलरच्या सुरुवातीला रणवीर म्हणतो, "हट्ट, स्वतःचा कम्फर्ट झोन सोडण्याचा हट्ट होता, पण हा हट्ट तुम्हाला कुठे नेऊन सोडेल सांगता येत नाही.

# पुन्हा एकदा तुफान राडा, 'बॉईज ३'चा धमाकेदार टीझर पाहिलात का?

ऐतिहासिक चित्रपटांबरोबरच मराठीमध्ये 'टाईमपास ३' सारखे बहुचर्चित चित्रपट देखील प्रदर्शनाच्या मार्गावर आहेत. अशातच आता आणखी एका चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. तो चित्रपट म्हणजे 'बॉईज ३'. या चित्रपटाच्या पहिल्या दोन भागांनी प्रेक्षकांचं भरभरुन मनोरंजन केलं. चित्रपटाच्या दोन्ही



भागांना बॉक्स ऑफिसवर उत्तम प्रतिसाद मिळाला. आता पुन्हा मराठीमधील हे बॉईज दंगा करायला तयार झाले आहेत. या चित्रपटाचा टीझर सोशल मीडियाद्वारे प्रदर्शित करण्यात आला आहे.

'बॉईज' चित्रपटामधील धैर्य, ढुंग्या आणि कबीर या पात्रांनी प्रेक्षकांना अगदी वेड लावलं. चित्रपटाला मिळालेला प्रतिसाद पाहता 'बॉईज २' प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाच्या दुसऱ्या भागाला देखील प्रेक्षकांनी भरभरुन प्रेम दिलं. आता पुन्हा एकदा 'बॉईज ३'च्या टीझरने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढवली आहे.

चित्रपटाच्या या टीझरमध्ये धैर्य, ढुंग्या आणि कबीर हे तीन पात्र दिसत आहेत. दाक्षिणात्य पेहरावामध्ये हे तिन्ही पात्र दिसताहेत. दुसरीकडे त्यांचा या टीझरमधील स्वॅग कमालीचा आहे. तर एक नव्या मुलीची एण्ट्री यामध्ये पाहायला मिळते. पण ही अभिनेत्री कोण? तसेच तिचा चेहरा या टीझरमध्ये दाखवण्यात आलेला नाही. धैर्य, ढुंग्या आणि कबीर म्हणजेच प्रतीक लाड, पार्थ भालेराव, सुमंत शिंदे या कलाकारांचं त्रिकुटच 'बॉईज ३'मध्ये पाहायला मिळेल.

## शॉर्ट न्यूज »

### अभिषेक-ज्योती जोडीला सुवर्ण



पॅरिस । महाईन्यूज

अभिषेक वर्मा आणि ज्योती सुरेखा वेन्नम या भारतीय जोडीने शनिवारी विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्यातील कंपाऊंड प्रकाराच्या मिश्र सांघिक गटात सुवर्णपदक पटकावले. अभिषेक-ज्योती या आघाडीच्या जोडीने फ्रान्सच्या जिन बोल्च आणि ४८ वर्षीय ऑलिम्पिक पदकविजेती सोफी डोडमोंट या फ्रेंच जोडीला अंतिम लढतीत १५२-१४९ असे नमवले. यासह त्यांनी भारताला कंपाऊंड मिश्र सांघिक गटातील पहिलेवहिले सुवर्णपदक मिळवून दिले. भारताची सर्वात यशस्वी कंपाऊंड जोडी असलेल्या अभिषेक आणि ज्योतीने गेल्या वर्षीच्या विश्वचषक स्पर्धेत रौप्यपदक कमावले होते. त्यांनी यंदा सुवर्णपदक पटकावत भारताला या स्पर्धेतील एकूण दुसरे पदक मिळवून दिले आहे.

# मालिका विजयासाठी प्रयभारतीय महिला संघाला विजयी आघाडी!

## दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेवर 5 गडी राखून मात; हरमनप्रीत, स्मृतीची चमक

। डाम्बुला । महाईन्यूज ।

कर्णधार हरमनप्रीत कौरची (नाबाद ३१ धावा व १ बळी) अष्टपैलू कामगिरी आणि सलामीवीर स्मृती मानधनाच्या (३४ चेंडूंत ३९ धावा) अप्रतिम फलंदाजीच्या बळावर भारतीय महिला संघाने शनिवारी दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात श्रीलंकेवर पाच गडी व पाच चेंडू राखून मात केली. यासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

डाम्बुला येथे झालेल्या या सामन्यात श्रीलंकेने दिलेले १२६ धावांचे आव्हान भारताने १९.१ षटकांत पूर्ण केले. स्मृती आणि शफाली वर्मा (१० चेंडूंत १७) यांनी भारताच्या डावाची आक्रमक सुरुवात केली. या दोघींनी ३.४ षटकांत ३० धावांची सलामी दिल्यावर शफालीला ओशादी रणसिंघेने माघारी धाडले. एस. मेघानाही (१० चेंडूंत १७) काही चांगले फटके मारून बाद झाली. यानंतर स्मृती आणि कर्णधार हरमनप्रीत यांनी तिसऱ्या



गडय़ासाठी ३८ धावांची भागिदारी रचली. स्मृतीने ३४ चेंडूंत आठ चौकारांसह ३९ धावा केल्यावर तिला इनोका रणवीराने बाद केले. मग हरमनप्रीतने डावाची सुत्रे आपल्या हातात घेतली आणि अखेरच्या षटकात भारताला

डाम्बुला येथे झालेल्या या सामन्यात श्रीलंकेने दिलेले १२६ धावांचे आव्हान भारताने १९.१ षटकांत पूर्ण केले. स्मृती आणि शफाली वर्मा (१० चेंडूंत १७) यांनी भारताच्या डावाची आक्रमक सुरुवात केली.

जिंकवून दिला. यास्तिका भाटिया (१३) आणि दीप्ती शर्मा (नाबाद ५) यांनी तिला काहीशी साथ दिली. गेल्या लढतीतील सामनावीर जेमिमा रॉड्रिग्जला (३) फारशी चमक दाखवता आली नाही.

त्यापूर्वी, विश्मी गुणरत्ने (५० चेंडूंत ४५) आणि कर्णधार चमारी अटापट्टू (४१ चेंडूंत ४३) यांच्या खेळींमुळे श्रीलंकेने २० षटकांत ७ बाद १२५ अशी धावसंख्या उभारली. या दोघींचा अपवाद वगळता श्रीलंकेची एकही फलंदाज दुहेरी धावसंख्या करू शकली नाही.

### संक्षिप्त धावफलक

श्रीलंका : २० षटकांत ७ बाद १२५ (विश्मी गुणरत्ने ४५, चमारी अटापट्टू ४३; दीप्ती शर्मा २/३४, हरमनप्रीत कौर १/१२) पराभूत वि. भारत : १९.१ षटकांत ५ बाद १२७ (स्मृती मानधना ३९, हरमनप्रीत कौरच्या नाबाद ३१; ओशादी रणसिंघे २/३२)

## रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा

# मुंबई पराभवाच्या छायेत!

। पीटीआय । महाईन्यूज ।

यश दुबे आणि शुभम शर्मा यांच्यापाठोपाठ रजत पाटीदारने (२१९ चेंडूंत १२२ धावा) केलेल्या शतकामुळे मध्य प्रदेशने रणजी करंडक स्पर्धेतील मुंबईविरुद्धच्या अंतिम सामन्यावरील वर्चस्व चौथ्या दिवशीही कायम राखले.

चौथ्या दिवशी मध्य प्रदेशने ५३६ धावांची मजल मारत पहिल्या डावात एकूण १६२ धावांची आघाडी मिळवली. मग मुंबईच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावात आक्रमक शैलीत खेळ केला. त्यामुळे चौथ्या दिवसअखेर मुंबईची २२ षटकांत २ बाद ११३ अशी धावसंख्या होती. मात्र, ते अजूनही ४९ धावांनी पिछाडीवर होते. कर्णधार पृथ्वी शॉ (५२ चेंडूंत ४४) आणि हार्दिक तामोरे (३२ चेंडूंत २५) यांनी फटकेबाज खेळी केल्यावर त्यांना अनुक्रमे गौरव यादव आणि कुमार कार्तिकेय यांनी माघारी पाठवले. दिवसअखेर अरमान जाफर (३४ चेंडूंत नाबाद ३०) आणि सुवेद पारकर (नाबाद



९) खेळपट्टीवर होते.

तत्पूर्वी, चौथ्या दिवशी ३ बाद ३६८ धावांवरून पुढे खेळताना मध्य प्रदेशच्या फलंदाजांनी चिवट फलंदाजी सुरू ठेवली. मध्य प्रदेशचा प्रमुख फलंदाज पाटीदारला तिसऱ्या दिवशी ५२ धावांवर जीवदान मिळाले होते. त्यानंतर मात्र त्याने मुंबईच्या गोलंदाजांना कोणतीही संधी दिली नाही. अर्धशतकानंतर त्याने संयमाने फलंदाजी करत खेळपट्टीवर अधिकाधिक वेळ घालवण्यावर भर दिला. त्याने १६३व्या चेंडूवर दोन धावा काढत आपले प्रथम श्रेणी कारकीर्दीतील आठवे शतक झळकावले. अखेर २१९ चेंडूंत २० चौकारांच्या साहाय्याने १२२ धावांची खेळी केल्यावर पाटीदारला तुषार देशपांडेने बाद केले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही